Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.712
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S02V14P008

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Jan'26
Issue–X(II), Volume–XIV

# रेखाकला, संगीत आणि ललित कला : सौंदर्यदृष्ट्या एकात्मतेचा संशोधनात्मक अभ्यास

**मनोज वामनराव चोपडे**
संशोधन विद्यार्थी, ललित कला विभाग व छंद मंदिर, रा.तू.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर
मो.नं : ९०२८६११५०६, ई-मेल: manojchopade12@gmail.com
**प्रा. डॉ. वैखरी वझलवार**
मार्गदर्शीका, (संगीत विभाग प्रमुख) एल. ए. डी. आणि श्रीमती आर.पी. महिला महाविद्यालय, शंकरनगर, नागपूर

**सारांश**

ललित कलेत रेखाकला व संगीत ही दोन भिन्न माध्यमे असली तरी त्यांचा मूळ उद्देश सौंदर्यानुभूती व भावनिर्मिती हाच आहे. ललित कलेचा विकास हा मानवी सर्जनशीलतेच्या इतिहासाशी निगडित आहे. आदिम गुहाचित्रांपासून ते आधुनिक संगीतमय व बहुअंगी कलेपर्यंत रेखाकला आणि संगीत या दोन मूलभूत माध्यमांनी ललित कलेच्या प्रवासाला दिशा दिली आहे. या शोधपत्रात रेखाकला, संगीत आणि ललित कला यांमधील सौंदर्यदृष्ट्या असलेली एकात्मता अभ्यासली आहे. दृश्य आणि श्राव्य या दोन भिन्न इंद्रियांच्या माध्यमातून होणारी अनुभूती मानवी मनावर समान प्रकारचा भावनिक व सौंदर्यात्मक परिणाम घडवून आणते. त्यामुळे रेषा, रंग, स्वर, ताल व लय हे सर्व घटक सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीने एकसंध प्रणाली तयार करतात, हे या संशोधनातून स्पष्ट होते.

**कीवर्ड्स**: रेखाकला, संगीत, ललित कला, सौंदर्यशास्त्र, एकात्मता, भावदर्शन, कला-विकास

## प्रस्तावना

ललित कला ही मानवी सर्जनशीलतेतून निर्माण होणारी सौंदर्यपूर्ण अभिव्यक्ती आहे. ललित कलांचे स्वरूप त्याच्या विविधतेमुळे आणि सर्जनशीलतेमुळे कॅरेटरीझ केले जाते, ज्यात दृश्य कला (चित्रकला, शिल्पकला, रेखांकन, छायाचित्रण), परफॉर्मिंग आर्ट्स (संगीत, नृत्य, नाट्य) आणि साहित्यिक कला (कविता, गद्य) यांचा समावेश आहे. आदिम मानवाने गुहाचित्रांद्वारे (रेषा) आणि तालबद्ध आवाजांद्वारे (स्वर) भावना व अनुभव व्यक्त केले. गुहाचित्रे ही दृश्य संवादाची सुरुवात होती, तर तालबद्ध स्वर हे संगीतातील आद्य रूप होते. याच टप्प्यावरून ललित कलेचा प्रवास सुरू झाला. मध्ययुगात कलेवर धार्मिक विषयांचे वर्चस्व होते, तर रेनेसान्स मानवतावाद आणि वैयक्तिक अभिव्यक्तीच्या पुनर्जन्माचे प्रतीक होते, ज्याचे उदाहरण लिओनार्डो दा विंची आणि मायकेल अँजेलो सारख्या कलाकारांमध्ये दिले गेले होते. पुढील शतकांमध्ये बारोक, रोकोको, रोमँटिसिझम, वास्तववाद आणि प्रभाववाद यासह विविध कला चळवळींचा उदय झाला, ज्यापैकी प्रत्येकाने ललित कलांच्या विकासास हातभार लावला. 20 व्या शतकात क्यूबिझम, अतिवास्तववाद आणि पॉप आर्ट सारख्या चळवळींसह क्रांतिकारक बदल झाले, ज्याने पारंपारिक कला प्रकारांच्या सीमा ओलांडल्या.

रेखाकला ही दृश्य सौंदर्याची, तर संगीत हे श्राव्य सौंदर्याची अभिव्यक्ती आहे. ही दोन्ही माध्यमे वेगवेगळी असली तरी त्यांचा अंतिम उद्देश सौंदर्यानुभव व भावप्रकटीकरण हा समान आहे. मानवी भावना व्यक्त करण्यासाठी शब्द हे एक माध्यम असले तरी ललित कलेत भावना अधिक सूक्ष्म आणि प्रभावी पद्धतीने रेखाचित्रे व संगीताद्वारे व्यक्त होतात. रेषा व स्वर हे ललित कलेतील मूलभूत घटक असून ते

https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S02V14P008


भावदर्शनाची शक्ती बाळगतात. चित्रातील एक साधी रेषा किंवा संगीतातील एक स्वरही प्रेक्षकाच्या मनात तीव्र भावनिक प्रतिक्रिया निर्माण करू शकतो. ललित कलांमध्ये व्यस्त राहिल्याने गंभीर विचार, समस्या सोडवण्याची कौशल्ये आणि भावनिक बुद्धिमत्ता वाढते, ज्यामुळे व्यक्तींना आत्म-अभिव्यक्तीचे साधन आणि जगाची सखोल समज मिळते. ललित कलांचे चिरस्थायी महत्त्व मानवी सर्जनशीलता आणि अभिव्यक्तीचे सार अंतर्भूत करून, आपले जीवन मोहित करण्याच्या, आव्हान देण्याच्या आणि समृद्ध करण्याच्या क्षमतेमध्ये आहे. रेषा ही दृश्य अभिव्यक्तीची सुरुवात आहे, तर स्वर हा श्राव्य अभिव्यक्तीचा केंद्रबिंदू आहे. म्हणूनच त्यांच्यात एकात्मतेचे नाते दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्टे**

- रेखाकला व संगीत यांचे सौंदर्यात्मक घटक समजून घेणे.
- ललित कलेतील दृश्य व श्राव्य या दोन्ही माध्यमांची भूमिका स्पष्ट करणे.
- दृश्य व श्राव्य सौंदर्याच्या एकात्मतेचा अभ्यास करणे.
- रेखाकला व संगीत यांच्या माध्यमातून होणाऱ्या भावदर्शनाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

- वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धत
- कला व संगीतशास्त्रातील संदर्भग्रंथांचा अभ्यास
- रेखाकला व संगीत यांचे तुलनात्मक विश्लेषण
- भावशास्त्र व सौंदर्यशास्त्राच्या सिद्धांतांचा आधार

**सौंदर्यशास्त्र आणि ललित कला**

सौंदर्यशास्त्र (Aesthetics) हे सौंदर्य, रस, अनुभूती, भावदर्शन आणि कलानुभव यांचा तात्त्विक अभ्यास करणारे शास्त्र आहे. कलाकृती पाहताना किंवा ऐकताना निर्माण होणारी आनंदानुभूती का आणि कशी निर्माण होते, याचा शोध सौंदर्यशास्त्र घेतो. ललितकला म्हणजे सौंदर्यनिर्मितीसाठी निर्माण केलेल्या कला. ललित कलेत सौंदर्य हे केवळ बाह्य रूपात नसून भावनिक, मानसिक व आध्यात्मिक पातळीवरही असते. सौंदर्यशास्त्र आणि ललितकला हे एकमेकांशी अतिशय घट्ट जोडलेले आहेत. रेखाचित्रे व संगीत या दोन्ही माध्यमांत सौंदर्य हे "अनुभूती" म्हणून प्रकट होते.

सौंदर्यशास्त्र हे ललितकलेचे तत्त्वज्ञान आहे, तर ललितकला हे सौंदर्यशास्त्राचे प्रत्यक्ष रूप आहे.

| **सौंदर्यशास्त्र** | **ललितकला** |
|---|---|
| तात्त्विक विचार | प्रत्यक्ष सर्जन |
| रस व सौंदर्याची मांडणी | रस व सौंदर्याची अनुभूती |
| "कला का सुंदर वाटते?" | "कला सुंदर कशी दिसते/ऐकू येते?" |

**रेखाकला: दृश्य सौंदर्याची अभिव्यक्ती**

भारतीय कलाविचारात रेषा म्हणजे प्राण मानली जाते. रेखाकलामध्ये रेषा, रंग, आकार, रचना आणि संतुलन हे सौंदर्याचे घटक आहेत. रेखाचित्रे पाहताना प्रेक्षकाला डोळ्यांद्वारे सौंदर्यानुभव प्राप्त होतो. रेषा ही केवळ संरचनात्मक घटक नसून ती भावना व्यक्त करणारी दृश्य भाषा आहे. रेषांमधील गती व लय ही भावदर्शनाला दिशा देते. आज रेखाकलेचा वापर जाहिरातकला, ग्राफिक डिझाइन, लोगो, ब्रँड ओळख,

https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S02V14P008
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Jan'26
Issue–X(II), Volume–XIV

ॲनिमेशन व डिजिटल आर्ट यामध्ये मोठ्या प्रमाणावर होत आहे. जलद संवाद आणि प्रभावी दृश्यरचना यासाठी रेखाकला अत्यंत उपयुक्त ठरते.

सौंदर्यशास्त्र हे कलेतील आनंदानुभूतीचा अभ्यास करते.

रेखाकलेत सौंदर्य निर्माण करणारे घटक पुढीलप्रमाणे-

**रेषेची गुणवत्ता** (मृदू, तीव्र, तुटक), **लय आणि पुनरावृत्ती**, संतुलन, रिक्त अवकाशाचा वापर.

रेषा जितकी स्वाभाविक तितकी कलाकृती अधिक प्रभावी ठरते. रेखाकलेत रंग नसतानाही भाव स्पष्टपणे व्यक्त होतात. कलाकाराच्या मानसिक स्थितीचे प्रतिबिंब रेषांमध्ये उमटते. भारतीय रससिद्धांतानुसार रेखाकलेतून नवरसांची अनुभूती मिळते.

**संगीत: श्राव्य सौंदर्याची अभिव्यक्ती**

संगीत म्हणजे स्वर, लय आणि ताल यांच्या नियोजनातून निर्माण होणारी नादात्मक कला. संगीत ऐकताना कानांद्वारे मनाला सौंदर्याचा अनुभव येतो. स्वर हे भावनांचे मूलभूत वाहक आहेत. स्वरांच्या संयोजनातून भावनांची तीव्रता वाढते. मानवी संस्कृतीच्या विकासात संगीताला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. आदिम काळातील नादनिर्मितीपासून ते शास्त्रीय व आधुनिक संगीतातील सूक्ष्म रचनांपर्यंत संगीताने मानवी भावविश्व समृद्ध केले आहे. सौंदर्यशास्त्रीय दृष्टीने संगीत हे केवळ ऐकण्याचे माध्यम नसून ते अनुभवण्याची कला आहे.

भारतीय परंपरेत म्हटले आहे—

**"गीतम् वाद्यम् तथा नृत्यम् त्रयं संगीत उच्यते"**

सौंदर्यशास्त्र हे कलेतील आनंद, सौंदर्य व अनुभूतीचा तात्त्विक अभ्यास करते. संगीतामध्ये सौंदर्य निर्माण करणारे प्रमुख घटक पुढीलप्रमाणे- स्वरसंयोजन (Melody), लय व ताल (Rhythm), नाद (Sound Quality), गायकी / वादन शैली. हे घटक एकत्र येऊन रसिकाच्या मनात सौंदर्यबोध निर्माण करतात.

भारतीय संगीताचा पाया रससिद्धांतावर आधारित आहे. भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात संगीताला रसोत्पत्तीचे प्रमुख साधन मानले आहे. ( विभाव + अनुभाव + व्यभिचारी भाव = रस) संगीत हे या तिन्ही घटकांना प्रभावीपणे व्यक्त करते. भारतीय संगीतात नवरसांचे प्रतिबिंब स्पष्टपणे दिसते.

**रेखाकला व संगीत: सौंदर्यदृष्ट्या एकात्मता**

| **घटक** | **रेखाकला** | **संगीत** |
|---|---|---|
| माध्यम | दृश्य | श्राव्य |
| सौंदर्य | रंग, रेषा | स्वर, लय |
| अनुभूती | दृष्टीद्वारे | श्रवणाद्वारे |
| परिणाम | भावनिक समाधान | भावनिक समाधान |

यावरून असे दिसते की माध्यम भिन्न असले तरी सौंदर्याचा अनुभव समान स्वरूपाचा आहे. हीच सौंदर्यदृष्ट्या एकात्मता आहे.

**ललित कलेतील एकात्मतेचे स्वरूप**

ललित कलेत अनेक वेळा रेखाकला व संगीत एकत्रितपणे वापरले जातात –

- नृत्यात: हालचाली, संगीत व रंगमंचीय रचना

- चित्रपटात: दृश्य आणि पार्श्वसंगीत
- नाट्यात: नेपथ्य व संगीत

येथे दृश्य व श्राव्य कला परस्परपूरक ठरून एकात्म सौंदर्यानुभव देतात. नृत्य, नाट्य, चित्रपट आणि जाहिरातकलेत रेषा व स्वर यांचा संयुक्त वापर दिसून येतो. रंगमंचीय रचना (रेषा) आणि पार्श्वसंगीत (स्वर) मिळून भावनांची तीव्रता वाढवतात. त्यामुळे कलानुभव अधिक समृद्ध होतो.

**जाहिरात व आधुनिक कलेतील उपयोग**

जाहिरात कलेत रेखाकला व संगीत यांचा एकत्रित वापर करून प्रेक्षकांवर सौंदर्यात्मक आणि भावात्मक शक्तीचा प्रभावी वापर केला जातो. या दोन्हींच्या योग्य संयोगातून जाहिराती केवळ माहिती देत नाहीत, तर संदेश अधिक प्रभावी, लक्षवेधी आणि दीर्घकाळ लक्षात राहणारा ठरतो.

**निष्कर्ष**

रेखाकला आणि संगीत या माध्यमांनी ललित कलेला ऐतिहासिक, भावात्मक व सौंदर्यात्मक समृद्धी दिली आहे. साध्या रेषांमधून गहन भावविश्व व्यक्त करण्याची क्षमता रेखाकलेत आहे. संगीत ही केवळ करमणुकीची कला नसून ती सौंदर्य, भावना आणि आत्मानुभूती यांचा संगम आहे. रेषा आणि स्वर यांच्या समन्वयातूनच ललित कलेचा सातत्यपूर्ण विकास घडून आला आहे." दृश्य व श्राव्य माध्यमांद्वारे व्यक्त होणाऱ्या भावना मूलतः एकसारख्या असून त्या मानवी अनुभूतीला थेट स्पर्श करतात. म्हणूनच असे म्हणता येते की – "रेखाकला, संगीत आणि ललित कला ही सौंदर्यदृष्ट्या एकात्म व अविभाज्य आहेत."

**संदर्भसूची**

Arnheim, R. (1974). Art and Visual Perception. University of California Press.
Cook, N. (1998). Music: A Very Short Introduction. Oxford University Press.
Kress, G., & Van Leeuwen, T. (2006). Reading Images. Routledge.
इंदूरकर, डॉ. विनोद (६ ऑगस्ट २०१२). *पाश्चात्त सौन्दर्यशास्त्र.* (प्रथमावृत्ती). नागपूर. विजय प्रकाशन
जगताप, प्रा. जयप्रकाश (n.d.). *दृककला- मुलतत्वे आणि आस्वाद.* पुणे. जगताप पब्लिशिंग हाऊस.
देशपांडे, श. (२०१०). *भारतीय सौंदर्यशास्त्र.* पुणे : कॉन्टिनेंटल.
घोंगे, पराग (१४ ऑगस्ट २०११). *लालित्यदर्शन- पूर्व.* (प्रथम आवृत्ती). नागपूर. विजय प्रकाशन.
रेगे, डॉ. गजानन मंगेश (१९७६). *जाहिरात कला आणि कल्पना.* पुणे. वि. ग. माटे. विश्वकर्मा मुद्रणालय.
भातखंडे, वि. न. (२००५). भारतीय संगीतशास्त्र.